तरुण भारत
Apla Nagpur | 2022-03-14 | Page- 4
epaper.tarunbharat.net

# एमबीए फॉर वर्किंग प्रोफेशनल्सच्या पहिल्या तुकडीचे उद्घाटन




◆ **नागपूर, १३ मार्च**

दि इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट नागपूर (आयआयएमएन)तर्फे पुणे कॅम्पसमधील एमबीए फॉर वर्किंग प्रोफेशनल्सच्या पहिल्या तुकडीचे उद्घाटन करण्यात आले. भारत फोर्ज लिमिटेडचे उपव्यवस्थापकीय संचालक अमित कल्याणी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. एमबीए कार्यक्रमाची अंमलबजावणी का आवश्यक आहे, याबाबत कल्याणी यांनी विस्तृत माहिती दिली. व्यावसायिक शाळेत कशाप्रकारे धडे मिळाले, याबद्दल सांगून कशाप्रकारे ज्ञानात भर पडल्याने वेगळ्या प्रकारे काम करता आले, याबाबत त्यांनी सांगितले. व्यावसायिक शाळेत लोकांबद्दल शिकायला मिळाले, असेही त्यांनी सांगितले. अशा प्रकारच्या कार्यक्रमांमुळे व्यावसायिकांच्या कौशल्याला धार येऊन खऱ्या अर्थाने नेतृत्वक्षमता येत असते. अशा प्रकारच्या एक्झिक्युटिव्ह प्रोग्राम्समध्ये कौशल्याला वाव मिळत असल्याने घर आणि कामाचे ठिकाण यामध्ये सहज समन्वय साधता येतो, असा सल्ला त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. कार्यक्रमात उपस्थित पाहुणे केपीएमजीचे भारतातील वरिष्ठ भागीदार प्रदीप उधास यांनी यशाचा मंत्र सांगितला. अंतर्गत क्षमता, ऊर्जा, परिश्रम तुमचा मार्ग ठरवीत असतात, असेही ते म्हणाले. मुख्य अर्थशास्त्रज्ञ आणि टाटा सन्समध्ये पॉलिस अ‍ॅण्ड अ‍ॅडव्होकसी विभागाच्या मुख्य रूपा पुरुषोत्तमन्, टेक महिंद्राचे प्रबंध संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी सी. पी. गुरुनानी यांनीही मार्गदर्शन केले. आयआयएम नागपूरचे संचालक डॉ. भीमराया मेत्री यांनी पाहुणे व एमबीए-डब्ल्यूपीच्या पहिल्या तुकडीचे स्वागत केले. यावेळी वैभव डांगे, सीआयआरटीचे संचालक के. व्ही. आर. के. प्रसाद, प्रो. सौरभ पांड्या यांनीही मार्गदर्शन केले. ◄*(तभा वृत्तसेवा)*

Powered by iDocuments